# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २६.०८.२०२६ बुधवार**

**''ईद–ए–मिलाद'' सणानिमीत्त मिरवणुक बंदोबस्त शांततेत संपन्न :–**

दिनांक २६.०८.२०२६ रोजी ''ईद–ए–मिलाद'' सणानिमीत्त आयोजीत मुख्य मिरवणुक ही सेवासदन चौक, सि.ए. रोड येथुन सुरू होवुन, दोसरभवन चौक, मोमीनपुरा, गोळीबार चौक, गंजीपेठ, शहीदचौक, सतरंजीपुरा मार्गे पुन्हा सि.ए. रोडवरून सेवासदन चौक येथे येवुन संपन्न झाली. मिरवणुकीमध्ये लाखोंच्या संख्येमध्ये लोकांचा सहभाग होता. मिरवणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात चारचाकी, तीनचाकी, दुचाकी वाहने समाविष्ठ होती. मार्गामध्ये प्रमुख ठिकाणी देखावे निर्माण करण्यात आलेले आहेत.

नागपुर शहर पोलीसांनी ईद ए मिलाद सणानिमीत्त निघणाऱ्या मिरवणुकीच्या अनुषंगाने शांतता व सुव्यवस्था अबाधित राहुन बंदोबस्त पार पडावा याकरीता बंदोबस्ताचे नियोजन करून व्यापक प्रमाणात बंदोबस्त नेमलेला होता. बंदोबस्तामध्ये मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, श्री. राजेंद्र दाभाडे, श्रीमती विनीता शाहु, नागपूर शहर, १० पोलीस उप आयुक्त, ११ सहा. पोलीस आयुक्त, ६२ पोलीस निरीक्षक, २४० सपोनि. व पोउपनि., १७८१ पुरूष अंमलदार, २०० महीला अंमलदार, रा.रा.पो.बलाचे. ०३ प्लाटुन, होमगार्ड चे ८०० पुरूष व २०० महीला सैनिक यांचा सहभाग होता. बंदोबस्तामध्ये सर्व वरीष्ठ अधिकाऱ्यांचे स्ट्रायकींग फोर्स नेमण्यात आलेले होते. जलद प्रतीसाद पथके, दंगा नियंत्रण पथके यांचाही बंदोबस्त समावेश होता. मिरवणुकीचे मार्गामधील प्रमुख पॉईटवर ०१ अधिकारी व १० अंमलदार यांची फिक्स पॉईट लावण्यात आले आहे. गर्दीचे मुख्य ठिकाणी सर्व्हेलन्स वाहनांची नेमणुक करण्यात आलेली आहे. संपुर्ण शहरातुन मुख्य मिरवणुकीमध्ये सामील होण्याकरीता निघणाऱ्या मिरवणुकींसोबतही योग्य तो बंदोबस्त नेमण्यात आलेला होता. मुख्य मिरवणुक सुरू होवुन, शांततेत पार पडली. प्रमुख मार्गावरील तसेच, शहरात बरेचसे चौकात देखावे निर्माण करण्यात आलेले असुन, त्यांना पाहण्याकरीता महीला व बालकांची गर्दी लक्षात घेता योग्य तो बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. याव्यतीरिक्त नियंत्रण कक्ष येथे मोठ्या प्रमाणात राखीव पथके तयार करून सुसज्ज ठेवण्यात आलेली आहेत.





## (कामगिरी)

## १) मानकापुर पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.०८.२०२६ चे २१.३० वा. ते २२.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत प्लॉट नं. १६८, बाबा बगदादीया नगर, मानकापुर येथे राहणारे फिर्यादी सय्यद मुजफ्फर अली मीर साबीर अली, वय ४२ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह अवस्थी चौक येथे पार्सल घेण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे स्लाईडींग खिडकी तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ६०,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ६,६४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान मानकापुर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून सिसिटीव्ही फुटेज चेक केले असता, संशयीत आरोपी हा एका ऑटोमध्ये बसुन ऑटोमोटीव्ह चौक येथील खाजगी बसस्टॅण्ड वरून, मध्यप्रदेश येथील बसमध्ये गेल्याचे समजले. अधिक माहीती प्राप्त केली असता, संशयीत हा शिवनी, मध्यप्रदेश येथे गेल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांचे पथकाने संशयीताचे वर्णन व फोटोवरून शिवनी, मध्यप्रदेश परीसरात ०३ दिवस मुक्काम करून, आरोपीचे नांव निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी दिपक अतारसिंग झारीया, वय २७ वर्षे, रा. गाव बिनेकी, मुंडा, पो.ठाणे घसौर, जि. शिवनी (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेवुन गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचेकडुन गुन्ह्यातील वेगवेगळे सोन्याचे दागिने व लगड असा एकुण ५,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा चोरी करण्यापुर्वी परिसरात पाहणी करून, बांधकाम सुरू असलेल्या दोन—तिन मजली ईमारतीच्या बाजुचे घर चोरी करण्यासाठी निश्चीत करून, बांधकाम सुरू असलेल्या ईमारतीचे टेरेसवर जावुन त्यानंतर शेजारील घराचे गच्चीवर जावुन, दरवाजा वा खिडकी तोडुन चोरी करून, गेलेल्या मार्गाने परत पळुन जातो, अशी त्याची गुन्ह्याची पध्दत असल्याचे निष्पन्न झाले.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हरीष काळसेकर, पोउपनि. अमीत बंडगर, सफौ. राजेश बरणे, पोहवा. राहुल गवई, पोअं. विपीन रक्षे, धिरजकुमार भोपळे, प्रशांत खंडारे व रोशन बागडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जुनी कामठी :— शस्त्र बाळगुन धुमधाम करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २५.०८.२०२६ चे २३.४० वा. चे सुमारास, जुनी कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, सुनिल बार समोर, मोटार स्टण्ड चौक येथे एक पांढऱ्या कत्थ्या रंगाचे व दुसरा निळ्या पांढऱ्या रंगाचे शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेले दोन ईसम शस्त्र घेवन धुमधाम करीत आहे. अशा माहीतवरून नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे दोन ईसम धुमाकुळ घालतांना दिसुन आले. ते पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना घेराव टाकुन ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) साहील राम हाटे, वय २३ वर्षे, २) नितीन रविंद्र धनाडे, वय २१ वर्षे, दोन्हीही रा. नेहरू नगर, उपजिल्हा रूग्णालयामागे, मोंढा, कामठी, नागपूर असे सांगीतले. आरोपी क्र. २ चे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ३५०/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे जुनी कामठी येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :— जिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल.**

फिर्यादी शुभम शेषरावजी मोटघरे, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट नं. ७१, श्रावण नगर, भांडेवाडी, नागपूर हे त्यांचे राहते घरी परीवारासह हजर असतांना, दिनांक २६.०८.२०२६ चे १२.४२ वा. चे सुमारास, त्यांना आवाज आल्याने त्यांनी घराचे पहील्या माळ्यावरील गॅलरीत येवुन पाहले असता, तेथील काचेला छिद्र झाल्याने तुटलेले दिसुन आले. त्यांनी घरी लावलेले सिसिटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, खंडवाणी टाऊनकडुन येणारे मोपेड गाडीवरील दोन अनोळखी ईसमांपैकी मागे बसलेल्या मुलाने त्याचे जवळील अग्नीशस्त्राने फिर्यादीचे घरावर फायर केल्याने गॅलरीचे रेलींगमध्ये काचावर लागुन काचाला छिद्र पडल्याचे दिसले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि. गंगाधर मुटकुरे ९४२२८२१६८० यांनी अनोळखी आरोपीविरूध्द कलम १०९(१), ३२४, ३(५) भा.न्या.सं., सहकलम २७(१) भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक २६.०८.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. ७५, राम मंदीर जवळ, गुलशन नगर, कळमना येथे राहणारे हेमचंद बाबुलाल आमाडार, वय ३३ वर्षे, हे त्यांचे राहते घरी ई—रिक्षाला चार्जींग करीत असल्याने, प्लगचा वायर चेक करीत असतांना त्यांना अचानक ईलेक्ट्रीक करंट लागला असता, त्यांची आई ही जवळ आली. त्यांना सुध्दा हलका करंट लागल्याने त्या ताबडतोब बाजुला झाल्या. त्यांचे मोठे भाऊ यांनी येवुन, प्लगचे बटन बंद केले असता, हेमचंद हे बेशुध्द होवुन खाली पडले. नातेवाईकांनी त्यांना उपचाराकरीता ओलाईट हॉस्पीटल व तेथुन मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. निवृत्ती फड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :—** स्वप्नील भिमराव कळमकर, वय ४६ वर्षे, रा. लष्करीबाग, न्यु समता विहार जवळ, पाचपावली, नागपूर हे दिनांक १४.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील

राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट ९ इंच, केस– काळे अंगात– निळ्या रंगाचे फुल शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :–** सौ. स्नेहा अक्षय मोरे, वय २६ वर्षे, रा. स्पंदन किराणा जवळ, देवी नगर, नारा गांव, जरीपटका, नागपुर ह्या दिनांक १४.०८.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन कोणाला काहीही न सांगता सोबत मुलगी नामे कु. अक्षीता वय ४ वर्षे व मुलगा लक्ष वय १ वर्षे यांचेसह निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, केस– काळे, भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :–** कु. सिमरन विजेंद्र सावले, वय १८ वर्षे, रा. भिमनगर वस्ती, नारा, जरीपटका, नागपुर ही दिनांक २०.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे लांब, अंगात– लाल रंगाचा टॉप व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते. ओळख– उजव्या गालावर कानाजवळ तीळ आहे.


स्वप्नील


सौ. स्नेहा


कु. सिमरन

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | २०५२/२०१६ | कलम ४८१, ४८३, ४२०, ३४ भा.दं.वि. | किशोर मोतीराम पौनिकर, रा. केडीके कॉलेज जवळ, दर्शन कॉलोनी, नंदनवन, नागपुर. | २१.०९.२०२६ |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४१४९/२००७ | कलम ४५७, ३८० भा.दं. वि. | १) अनिल दिवाकर डोंगरे, वय ३५ वर्षे, रा. शास्त्रीनगर झोपडपट्टी, नंदनवन, नागपुर. २) प्रविण उर्फ बाल्या आर. साईवन, वय २१ वर्षे, रा. मिनीमाता नगर, हनुमान मंदीर जवळ, कापसे चे घरी | २१.०९.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | किरायाने, कळमना. नागपुर.<br>३) राजेश मेश्राम, वय २१ वर्षे, रा. चिखली ले'आऊट, म्हाडा क्वॉर्टर, उस्मानखानचे घराजवळ, कळमना, नागपुर. | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**